सकाळ
२४/०५/२०२२



गडहिंग्लज : रवळनाथच्या रौप्य महोत्सवी वर्ष सांगता कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. डावीकडून सतीश मराठे, सावित्री सिंह, अनिल कवडे, बाबासाहेब वाघमोडे, एम. एल. चौगुले व व्ही. के. मायदेव.

# 'रवळनाथ'ने आंतरराष्ट्रीय व्हीजन पाहावे : डॉ. मुळे

## रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या रौप्यमहोत्सवाची सांगता

**गडहिंग्लज, ता. २३ :** रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने गेल्या अडीच दशकांचे सिंहावलोकन करण्याबरोबरच पुढील २५ वर्षांतील वाटचालीचा रोडमॅप ठरवून आता देशभर शाखा विस्तारासह आंतरराष्ट्रीय व्हीजन पाहावे, असे आवाहन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी आज येथे केले. श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्यमहोत्सवी सांगता सोहळ्यात ते बोलत होते. सहकार आयुक्त अनिल कवडे, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, राष्ट्रीय सहकारी संघाच्या कार्यकारी संचालिका सावित्री सिंह, प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव व्यासपीठावर होते.

डॉ. मुळे म्हणाले, 'रवळनाथने गुणवत्तेच्या जोरावर स्वत:चा ब्रँड निर्माण केला आहे.

कवडे, मराठे, सावित्री सिंह यांचे भाषण झाले. संस्थापक अध्यक्ष श्री. चौगुले यांनी प्रास्ताविकात भविष्यात दिल्ली व गोवा कार्यक्षेत्रासह पुण्यात शाखा सुरू करण्याचा मानस असून गृह कर्जदारांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ देण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. यावेळी 'यशोगाथा' स्मरणिकेचे प्रकाशन डॉ. मुळे यांच्या हस्ते झाले. शाखा अध्यक्ष, संस्थापक-संचालकांचा सत्कार झाला. डॉ. दत्ता पाटील यांनी स्मरणिकेची माहिती दिली. मीना रिंगणे यांनी स्वागत केले, किरण पाटील व रेखा पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत




गडहिंग्लज येथे 'रवळनाथची यशोगाथा' स्मरणिकेचे प्रकाशन ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते झाले. डावीकडून शंकर देसाई, रामचंद्र निळपणकर, उमा तोरगल्ली, किरण पोतदार, दत्तात्रय मायदेव, सावित्री सिंह, सतीश मराठे, अनिल कवडे, एम. एल. चौगुले, बाबासाहेब वाघमोडे, आनंदा मेणसे उपस्थित होते.

Kolhapur Main
Page No. 4 May 24, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# ‘रवळनाथ’ संस्थेने देश-विदेशांत शाखाविस्तार करावा : ज्ञानेश्वर मुळे

## गडहिंग्लजमध्ये रौप्यमहोत्सवाची सांगता, स्मरणिका प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** ‘रवळनाथ’ने सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रांत अल्पावधीत केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. संस्थेने आता भविष्याचा रोडमॅप आणि व्यापक व्हिजनसह देश-विदेशांत शाखाविस्तार करावा, असा सल्ला राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी दिला.

श्री. रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. सहकार आयुक्त अनिल कवडे, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, राष्ट्रीय सहकारी संघाच्या कार्यकारी संचालक सावित्री सिंह, प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील गणेश मंगल कार्यालयात हा कार्यक्रम झाला. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. ते म्हणाले, गोवा व दिल्लीचा कार्यक्षेत्रात समावेश आणि प्रस्तावित सांगली, कराड व पुणे या शाखांना लवकरच मंजुरी मिळेल.

मराठे म्हणाले, ‘रवळनाथ’ ही हौसिंग फायनान्समधील युनिक संस्था आहे. कवडे म्हणाले, निवारा चळवळीत ‘रवळनाथ’ने दिलेले योगदान कौतुकास्पद आहे.

सावित्री सिंह म्हणाल्या, सहकाराचे रोलमॉडेल असणाऱ्या महाराष्ट्रातील विविध उपक्रम राष्ट्रीय पातळीवर नेण्यास ‘रवळनाथ’ने पुढाकार घ्यावा.

यावेळी संस्थापक संचालकांसह स्मरणिकेचे संपादक दत्ता पाटील यांचा सत्कार झाला. कार्यक्रमास अरुण काकडे, अमर शिंदे, अशोक चराटी, बाळासाहेब घुगरे, आदी उपस्थित होते. मीना रिंगणे यांनी स्वागत केले. किरण पाटील व रेखा पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. वासुदेव मायदेव यांनी आभार मानले. नूरजहाँ सोलापुरे यांच्या पसायदानाने सांगता झाली.

### रौप्यमहोत्सवाची अनोखी भेट

रौप्यमहोत्सवाची भेट म्हणून संस्थेच्या सर्व सभासदांना प्रतिवर्षाला १०० रुपयांप्रमाणे ४५ लाखांचे जादा शेअर्स देण्याची घोषणा संस्थापक अध्यक्ष चौगुले यांनी केली.

### ग्रामस्थांकडून गौरव

मुगळी येथील सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या चौगुले यांनी ‘रवळनाथ’च्या माध्यमातून सहकारात नवा आदर्श निर्माण केल्याबद्दल त्यांचा मुगळी ग्रामस्थांतर्फे मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

A BRAND OF RAJNISH WELLNESS LIMITED
आपल्या वैवाहिक जीवनात
भरा एक जोशपूर्ण जाणीव

पुण्य नगरी

# महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र आदर्शवत : सावित्री सिंग

## रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचा रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता समारंभ

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे सहकार क्षेत्र देशात आदर्शवत असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रीय सहकारी संघाच्या कार्यकारी संचालिका सावित्री सिंग यांनी काढले.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजराच्या (मल्टिस्टेट) रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग नवी दिल्लीचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे होते.

मीना रिंगणे यांनी स्वागत केले. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकामध्ये बँकेच्या सांपत्तिक स्थितीची माहिती दिली.

संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सभासदांच्या शेअर्स रकमेत वर्षाला शंभर रुपयांप्रमाणे वर्ग करून संस्थेमार्फत सभासदांना अनोखी भेट दिली. यावेळी संस्थेच्या 'यशोगाथा' या स्मरणिकेचे पालखीतून आगमन करून प्रकाशन करण्यात आले.




गडहिंग्लज : रवळनाथ रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता समारंभप्रसंगी बोलताना सावित्री सिंग. सोबत ज्ञानेश्वर मुळे, एम. एल. चौगुले यांच्यासह अन्य.

संस्थेची २५ वर्षात जलदगतीने प्रगती झालेली आहे. आता संस्थेने राष्ट्रीय सहकार संस्थेचे सभासदत्व घेणे गरजेचे आहे. शासनाची नवी ध्येय-धोरणे अमलात आणल्यानंतर संस्थेची प्रगती होईल. सहकाराच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजनांच्या माध्यमातून गोरगरिबांच्या घरकुलासाठी संस्थेने प्रयत्न करावेत, असे आवाहन सावित्री सिंग यांनी केले. यावेळी डॉ. मुळे म्हणाले, रवळनाथ संस्थेचा सुवर्णकाळ सुरू आहे. ही संस्था आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्था आहे. रवळनाथचे ब्रॅण्ड ॲम्बेसिडरपद गौरवास्पद असल्याचे सांगितले. भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे म्हणाले, रवळनाथ ही देशातील एकमेव मल्टिस्टेट हौसिंग फायनान्स संस्था आहे. सहकार आयुक्त व निबंधक अनिल कवडे म्हणाले, चौगुले यांनी संस्थेशी सर्व क्षेत्रातील माणसे जोडली आहेत. सहकार चळवळीत हौसिंग फायनान्स सोसायटी नीटनेटक्या कशा चालू शकतील यासाठी सहकार व्यवस्थापन केली पाहिजे.

कार्यक्रमास प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, काशीनाथ चराटी, अनिल देशपांडे, बाळासाहेब घुगरे, दत्तात्रय बरगे, डीडीआर अमर शिंदे, सहायक निबंधक ए. आर. गराडे यांच्यासह रवळनाथ हौसिंग फायनान्ससह आजरा अर्बन आणि गडहिंग्लज अर्बन बँकेचे संचालक, सभासद उपस्थित होते. दत्ता पाटील यांनी स्मरणिकेतील लेखांची माहिती दिली. किरण पाटील व रेखा पोतदार यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# ‘रवळनाथ’ने सहकारात मानदंड उभारला

## सहकार आयुक्त कवडे : रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या रौप्यमहोत्सवाची सांगता

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ संस्थेने सहकारातून माणसे जोडली. अर्थसहाय्यातून हजारोंना निवारा देण्याचे काम करत रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने सहकारात खऱ्या अर्थाने मानदंड उभारला आहे, असे प्रतिपादन राज्यातील सहकारी संस्थांचे सहकार आयुक्त व निबंधक अनिल कवडे यांनी केले.

येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरा (मल्टिस्टेट) या संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे होते. येथील गणेश मंगल कार्यालयात हा कार्यक्रम झाला.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, राष्ट्रीय सहकारी संघ नवी दिल्लीच्या कार्यकारी संचालिका सावित्री सिंह, प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संचालिका मीना रिंगणे यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी संस्थेच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. यावेळी विविध शाखांचे अध्यक्ष, संचालकांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या संपूर्ण वाटचालीवर प्रकाशझोत टाकणारी स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. सतीश मराठे यांनी देशातील बहुतांश जनतेची निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी केवळ मोठ्या बँकांवर अवलंबून राहून चालणार नाही. ‘रवळनाथ’ने ग्रामीण आणि निमशहरी भागात लोकांना निवाऱ्यासाठी अर्थसहाय्य करून जपलेली बांधिलकी कौतुकास्पद असल्याचे मत मांडले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. मुळे यांनी, ‘रवळनाथ’सारख्या राजकारणविरहीत संस्थेचे ब्रँड ॲम्बेसिडर होणे ही आपल्यासाठी गौरवास्पद बाब आहे. आज आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेल्या संस्था चालविण्याचा आग्रह ‘रवळनाथ’ला होतो, यावरून रवळनाथची कामगिरी सिद्ध होते. पुढील अनेक वर्षांचे व्हिजन समोर ठेवल्यास ही संस्था वैश्विक स्तरावर पोहोचण्यास वेळ लागणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह सर्व संचालक, विविध शाखांचे प्रमुख, सल्लागार, सभासद, कर्मचारी उपस्थित होते. किरण पाटील, रेखा पोतदार यांनी सूत्रसंचालन केले.



**गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना भारतीय रिझर्व्ह बँक संचालक सतीश मराठे. शेजारी डावीकडून सावित्री सिंह, डॉ. ज्ञानेश्वर मुळे, अनिल कवडे, एम. एल. चौगुले आदी.**

### महिलांना सहकारात संधी हवी

सावित्री सिंह म्हणाल्या, सामान्य नागरिक आजही सहकारापासून दूरच आहे. ग्रामीण भागातील जनता आर्थिक गरजांसाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडे जातात. हे ग्राहक सहकारी वित्त संस्थांकडे कसे वळतील, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महिलांना सहकारापासून वंचित ठेवले जात असून, त्यांना या क्षेत्रात संधी द्या.